# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // प्रेसनोट //

दि.३०/०१/२०२४

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा करण्यात येतो.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) मार्फत पाणी पुरवठा योजनेच्या अंतर्गत बारवी गुरुत्व वाहिनीचे कटाई नाका ते कल्याण फाटा येथे तातडीची देखभाल व दुरुस्तीची कामे करण्याकरीता (२४ तासांचा) शटडाऊन घेतल्याने **गुरुवार दि.०१/०२/२०२४ रोजी रात्री १२:०० वा. ते शुक्रवार दि.०२/०२/२०२४ रोजी रात्री १२:०० वाजेपर्यंत (२४ तास) मिरा-भाईंदर शहरास एम.आय.डी.सी. प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा पूर्णपणे बंद राहील.** तसेच स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा सुरु राहणार आहे.

तरी एम.आय.डी.सी. प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा पुर्ववत होईपर्यंत मिरा-भाईंदर शहरास पाणी पुरवठा कमी दाबाने व उशीराने होईल. नागरीकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका